# स्थायी समिती सभा दिनांक १२.०६.२०१५ रोजीचे कार्यवृत्त

## भाग-१

जिल्हा परिषद, स्थायी समिती सभा डॉ. पंजाबराव देशमुख सभागृह, जिल्हा परिषद, अमरावती येथे दिनांक १२.०६.२०१५ रोजी दुपारी १.०० वाजता आयोजित करण्यात आली. मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद, अमरावती यांनी सन्मा. उपाध्यक्ष श्री. सतीश हाडोळे, सन्मा. सभापती, बांधकाम व शिक्षण श्री. गिरीष कराळे, सन्मा. स्थायी समिती सदस्य, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, सचिव तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा), खाते प्रमुख व पत्रकार यांचे सभेच्या उपस्थिती निमित्ताने स्वागत केले व सचिव यांना सभा सुरु करण्यास अनुमती दिली.

**विषय क्रमांक १ :- दि.१३ मे २०१५ रोजी संपन्न झालेल्या जि.प. स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त भाग-१ वाचुन कायम करणेबाबतच्या विषयावर खालीलप्रमाणे सभागृहामध्ये साधक बाधक चर्चा होऊन सर्वानुमते मंजुरात प्रदान करण्यात आली.**

**मा.श्री. अनिरुध्द उर्फ बबलुभाऊ देशमुख, सदस्य :-** मागील सभेत झालेल्या चर्चेप्रमाणे श्री. किरण ठाकरे, उप अभियंता बांधकाम उप विभाग, दर्यापूर यांचेवर काय कारवाई करण्यात आली ते सांगावे?

**का.अ.(बां) :-** श्री.किरण ठाकरे, उप अभियंता (बांधकाम) यांचेबाबत उप विभाग व विभागीय स्तरावर अशी कोणत्याही प्रकारची लेखी स्वरुपात तक्रार प्राप्त झालेली नाही. त्यामुळे चौकशी करण्यात आली नाही.

**मा. सभापती (बांधकाम व शिक्षण) :-** श्री. किरण ठाकरे, उप अभियंता यांचेबाबत बांधकाम समितीच्या बैठकीत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या आणि याबाबत समितीच्या सभेत चर्चासुध्दा झालेली आहे.

**मा.श्री. अनिरुध्द उर्फ बबलुभाऊ देशमुख, सदस्य :-** श्री. ठाकरे, उप अभियंता दर्यापूर यांचेबाबत मागील सभेत चर्चा झालेली आहे, त्यामुळे हीच तक्रार समजुन चौकशी का करण्यात आली नाही? श्री. ठाकरे, उप अभियंता यांनी बोगस व खराब काम झाल्याचे रिपोर्ट दिले व त्याच कामाचे नंतर चांगली कामे झाल्याचे रिपोर्ट दिले हे कसे काय? तसेच ठेकेदारांना त्यांच्या कामांची ४ ते ५ महिने बील दिली नाही व बिले मंजुर करण्याकरीता पैशांची मागणी केली कींवा कसे? म्हणुन याबाबत चौकशी करण्यात यावी.

**का.अ.(बां) :-** श्री. ठाकरे, उप अभियंता दर्यापूर यांचे उपविभागांतर्गत सन २०१४-१५ मध्ये झालेल्या कामाची चौकशी करुन १५ दिवसात अहवाल देण्यात येईल.

**मा.उपाध्यक्ष :-** बांधकाम उपविभाग, दर्यापूर अंतर्गत असलेली पुरहाणी दुरुस्तीच्या प्रत्येक कामाची काम निहाय चौकशी करुन कार्यकारी अभियंता,बांधकाम यांनी पुढील सभेत सविस्तर अहवाल सादर करावा.

**मा. अध्यक्ष :-** मा.उपाध्यक्ष यांनी सुचविल्याप्रमाणे श्री. ठाकरे, उप अभियंता (बांधकाम) उपविभाग,दर्यापूर यांचेबाबत कार्यकारी अभियंता (बां), जिल्हा परिषद, अमरावती यांनी कामनिहाय चौकशी करुन पुढील सभेत अहवाल द्यावा.

**मा.श्री. अनिरुध्द उर्फ बबलुभाऊ देशमुख, सदस्य :-** मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती हे कोठे आहेत?

**मा. अध्यक्ष :-** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांच्या कक्षात समुपदेशन सुरु आहे. त्यामुळे सभेकरीता ५ मिनीटात येत आहेत असा त्यांचा संदेश (message) आलेला आहे.

**विषय क्रमांक २ :- शासनाकडुन प्राप्त परिपत्रके वाचुन दाखविणे.**

**शि.अ.(प्राथ) :-** शाळा प्रवेशोत्सवाचे आयोजन करण्याबाबत शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक उपक्रम २३१५/प्र.क्र.१२२/एस.डी.४, मंत्रालय, मुंबई ३२, दि. ९ जून, २०१५ चे सभागृहात वाचन करण्यात आले.

**मा.श्री. प्रताप अभ्यंकर, सदस्य :-** प्रत्येक शाळेत योगा अनिवार्य (compulsory) आहे काय?

**शि.अ.(प्राथ) :-** प्रत्येक शाळेत योगा अनिवार्य (compulsory) असल्याबाबत आदेश प्राप्त नाहीत.

**स.क.अ. :-** हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध घालण्याबाबत आणि त्यांचे पुर्नवसन करण्याबाबत अधिनियम, २०१३ ची अंमलबजावणी करण्याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : सफाई- २०१३/प्र.क्र.२११(भाग-२)/महामंडळे, मंत्रालय, मुंबई ३२ दि.१६ ऑक्टोबर, २०१४ चे सभागृहात वाचन करण्यात आले.

**मा. सभापती स्थायी समिती यांचे परवानगीने येणारे वेळेवरील विषय**

**विषय क्रमांक १ :-तिर्थक्षेत्र विकास योजना सन २०१४-१५ अंतर्गत असलेल्या श्री. शंकर महाराज संस्थान, ता. धामणगांव रेल्वे येथे स्त्रियांकरीता भक्त निवास बांधकाम करणे या कामांच्या निविदा स्विकृतीस जि.प. स्थायी समिती सभेची मान्यता मिळणेबाबत या विषयावर सभागृहामध्ये साधक बाधक चर्चा होऊन सर्वानुमते मंजुरात प्रदान करण्यात आली.**

**विषय क्रमांक २ :- १३ वा केंद्रीय वित्त आयोग सन २०१४-१५ अंतर्गत असलेल्या अंजनगांव सु. हुसेनपुर खोडगांव रस्ता सा.क्र.०/०० ते ३/०० इजिमा-२१ वर दुरुस्ती करणे, ता. अंजनगांव सुर्जी या कामांच्या निविदा स्विकृतीस जि.प. स्थायी समिती सभेची मान्यता मिळणेबाबत.**

**विषय क्रमांक ३ :- १३ वा केंद्रीय वित्त आयोग सन २०१४-१५ अंतर्गत असलेल्या विरुळ दिपोरी वाई राजना चांदुर रेल्वे (इजिमा ६३) रस्त्याची सुधारणा करणे किती १०/०० ते १३/००, ता. चांदुर रेल्वे या कामांच्या निविदा स्विकृतीस जि.प. स्थायी समिती सभेची मान्यता मिळणेबाबत.**

**विषय क्रमांक ४ :- १३ वा केंद्रीय वित्त आयोग सन २०१४-१५ अंतर्गत असलेल्या खरपी ते मुक्तागिरी रस्त्याची सुधारण करणे किमी १/५०० ते ३/५०० ग्रामा-३२ ता. अचलपूर या कामाच्या निविदा स्विकृतीस जि.प. स्थायी समिती सभेची मान्यता मिळणेबाबत.**

**<u>मा. सभापती (बांधकाम व शिक्षण)</u> :-** वरील कामांबाबत प्रपत्र ब दरापेक्षा १० टक्के पेक्षा कमी दराने कामे करण्याबाबत कंत्राटदारांचे स्पष्टीकरण घेण्यात यावे.

**<u>मा.श्री. अभिजीत ढेपे, सदस्य</u> :-** सन्मा सभापती (बांधकाम व शिक्षण) यांचे मताशी मी सहमत आहे. त्यामुळे प्रपत्र ब दरापेक्षा एवढया कमी दराने कामे कसे होतील ? म्हणुन संबंधित कंत्राटदारांचे स्पष्टीकरण घेण्यात यावे.

**<u>मा.उपाध्यक्ष</u> :-** तसेच रामकीशोर ॲन्ड सन्स् व संजय कंस्ट्रक्शन यांचे कडे जि.प.ची बांधकामे प्रलंबीत असल्याबाबत माहिती आहे.तेव्हा पुढील सभेत याबाबत काम निहाय अहवाल कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी ठेवावा.

**<u>मा.श्री. प्रताप अभ्यंकर, सदस्य</u> :-** वडगांव ते हनवतखेडा हा रस्ता मिनी म्हाडामधुन मंजुर असुन सदरचा रस्ता प्रपत्र ब पेक्षा २५ टक्के कमी दराने निविदा टाकण्यात आली म्हणजेच मुद्दाम एवढया कमी दराने निविदा टाकल्यामुळे हे काम कसे पुर्ण होईल? व आता संबंधित कंत्राटदार काम करण्यास टाळाटाळ करीत आहे. म्हणुन प्रपत्र ब दरापेक्षा १० टक्के पेक्षा कमी दराने कामे करण्याबाबत कंत्राटदारांचे स्पष्टीकरण घेण्यात यावे.

**<u>मा.श्री. अनिरुध्द उर्फ बबलुभाऊ देशमुख, सदस्य</u> :-** प्रपत्र ब दरापेक्षा १० टक्केपेक्षा कमी दराने कामे कसे होतील याबाबत संबंधित कंत्राटदारांचे स्पष्टीकरण घेण्यात यावे व वरील केंद्रिय १३ व्या वित्त आयोगासंबंधातील तिन्ही विषय पुढील सभेत ठेवण्यात यावे.

**<u>मा. अध्यक्ष</u> :-** सन्मा सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे प्रपत्र ब दरापेक्षा १० टक्केपेक्षा कमी दराने निविदा दाखल केलेल्या संबंधित कंत्राटदारांचे स्पष्टीकरण घेण्यात यावे. करीता विषय क्रमांक १ मंजुर करण्यात येत असुन उर्वरीत २, ३ व ४ विषया संबंधात कंत्राटदारांचे स्पष्टीकरण प्राप्त झाल्यानंतर पुढील सभेत सदर विषय ठेवण्यात यावे.

**<u>विषय क्रमांक</u> ५:- कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा धानोरा म्हाली, ता. चांदुर रेल्वे, जि. अमरावती या कामांच्या निविदा स्विकृतीस जि.प. स्थायी समिती सभेची मान्यता मिळणेबाबत या विषयावर सभागृहामध्ये साधक बाधक चर्चा होऊन सर्वानुमते मंजुरात प्रदान करण्यात आली.**

**<u>मा. सभापती (बांधकाम व शिक्षण)</u> :-** ई वर्ग जमीन हर्रासाचा निधी हा त्या शाळेचा निधी असतो. परंतु हा निधी पंचायत समिती स्तरावर पडुन आहे. सदरचा निधी खर्च करण्याकरीता संबंधित शाळेतील शाळा व्यवस्थापन समितीचा ठराव घेणे आवश्यक आहे. तसेच हा निधी त्या संबंधित शाळेवर खर्च केल्यात जात नाही, याबाबत गावकऱ्यांच्या तक्रारी आहेत.

**<u>मा.श्री. अभिजीत ढेपे, सदस्य</u> :-** हा निधी खर्च करतांनी संबधित मुख्याध्यापकांना विश्वासात घेऊन खर्च करणे आवश्यक आहे. असे न होता पंचायत समिती स्तरावरुन परस्पर खर्च झाला असेल तर संबंधित अधिकाऱ्यांकडुन वसुली करण्यात यावी.

**<u>मा.श्री. प्रताप अभ्यंकर, सदस्य</u> :-** जिल्हा परिषदेची सन २०१५-१६ ची दैनंदिनी (डायरी) अद्यापपर्यंत का तयार करण्यात आल्या नाहीत?

**<u>सचिव</u> :-** याबाबत मला माहीती नाही, कारण मी कालच उप मु.का.अ.(सा) या पदाचा प्रभार घेतला आहे.

**<u>मा.श्री. अनिरुध्द उर्फ बबलुभाऊ देशमुख, सदस्य</u> :-** ६ महिने झाले तरी दैनंदिनी का छापण्यात आल्या नाहीत?

**<u>मा.मु.का.अ.</u>:-** सन २०१५-१६ च्या जिल्हा परिषदेच्या दैनंदिनीबाबत त्वरीत निर्णय घेण्यात येईल.

**<u>मा.श्री. अनिरुध्द उर्फ बबलुभाऊ देशमुख, सदस्य</u> :-** ६ महिने झाले तरी दैनंदिनी का छापण्यात आल्या नाहीत? व याला जबाबदार कोण? याबाबत संबंधिताकडुन खुलासा मागवुन पुढील सभेपर्यंत सन्मा. सदस्यांना दैनंदिनी उपलब्ध करुन देण्यात याव्या.

**<u>मा.मु.का.अ.</u>:-** याबाबत संबंधितांकडुन खुलासा मागविण्यात येईल.

**<u>मा.श्री. अनिरुध्द उर्फ बबलुभाऊ देशमुख, सदस्य</u> :-** मा.उपाध्यक्ष व मा. सभापती (बांधकाम व शिक्षण), जिल्हा परिषद, अमरावती यांच्या शासकीय निवासस्थानी केलेल्या बांधकामाबाबत (दुरुस्तीबाबत) वर्तमानपत्रात बातम्या प्रसिध्द होत आहेत. त्यामुळे येथील झालेल्या बांधकामाबाबत माहिती कार्यकारी अभियंता (बां) यांनी पुढील सभेत अवलोकनार्थ ठेवावी.

**<u>मा. अध्यक्ष</u> :-** सन्मा पदाधिकारी, सर्व सन्मा स्थायी समिती सदस्य ,कार्यकारी अभियंता (बांधकाम),संबंधीत शाखा अभियंता,उपअभियंता व पत्रकार बंधु यांचेसह मा.उपाध्यक्ष व मा. सभापती (बांधकाम व शिक्षण), जिल्हा परिषद, अमरावती यांच्या शासकीय निवासस्थानी पुढील स्थायी समितीची सभा संपल्यानंतर भेट देवुन कामाची पाहणी करतील.

वरीलप्रमाणे सभेमध्ये विषय सुचीवरील मागील सभेचे कार्यवृत्त भाग -१ वाचुन कायम करणे तथा शासन परिपत्रकांचे वाचन करणे या विषयासह २ व मा.सभापती स्थायी समिती यांचे परवानगीने येणारे वेळेवरील ५ व चर्चेतील निरंक विषय असे एकुण ०७ विषयावर साधक बाधक चर्चा होऊन वरील प्रमाणे ०४ विषयास सभेमध्ये मंजुरात प्रदान करण्यात येऊन त्या अनुषंगाने ०२ ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आले व उर्वरीत ३ विषय पुढील सभेत ठेवण्याबाबत निर्देशित करण्यात आले.

यानंतर सचिव तथा उप मु.का.अ.(सा) यांनी आजचे सभेचे कामकाज चालविण्यास उत्तम सहकार्य केल्याबद्दल सर्व उपस्थितांचे आभार मानून मा.पिठासीन अधिकारी, स्थायी समिती, जिल्हा परिषद, अमरावती यांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

सचिव तथा,
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य),
जिल्हा परिषद अमरावती

अध्यक्ष तथा
सभापती स्थायी समिती
जिल्हा परिषद अमरावती